# सुरेश कुटेंच्या अडचणी वाढल्या; अखेर गुन्हा नोंद


हॉटेल गौरव

रेस्टो बार, डिलक्स रूम
एसपी ऑफीससमोर, बार्शी रोड, बीड
प्रो.प्रा.नितीन खोड
एक वेळ आवश्य भेट द्या



सायं.दैनिक
बीड
# प्रारंभ
संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे



॥ श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्री दत्त कृपा ॥
हॉटेल बळीराजा
फॅमिली गार्डन रेस्टॉरंट ॲण्ड फास्ट फूड
* साऊथ इंडियन
* पंजाबी * चायनीज
* तंदूर * महाराष्ट्रीयन
नाष्टा व जेवणाची उत्तम सोय
संपर्क : 8999854954, 8668738334

पत्ता : धुळे-सोलापूर हायवे, बिंदुसरा डॅम जवळ, मंझरी-कर्जनी फाटा, पाली बीड



बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ४ थे ■ अंक ८७ ■ शनिवार दि. १८ मे २०२४ ■ RNI MAHMAR/2021/81481 ■ पाने-४ ■ किंमत ३ रुपये Email-prarambh2023@gmail.com


# ...तर 288 जागा लढवणार

## ७ ते ८ उपमुख्यमंत्री करणार



### मनोज जरांगे पाटलांचा फॉर्म्युला ठरला

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

**सगेसोयरे अंमलबजावणी आणि मराठा कुणबी एकच ही मागणी मान्य न झाल्यास मी मैदानात उतरणार, राज्यात सगळ्या जातींना सोबत घेत २८८ जागा लढवणार अशी घोषणाच मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, राजकारण माझा मार्ग नाही. मराठा एकत्र आल्याने तुमची लोकसभेला फजिती झाली, हे संकेत आहेत. माझ्या नादी लागू नका. सगेसोयरे अंमलबजावणी आणि मराठा कुणबी एकच ही मागणी मान्य करा एवढीच माझं म्हणणं आहे. माझा राजकारणाशी काही संबंध नाही. मला माझ्या समाजातील पोरं मोठी करायची आहे. समाजाला ताकद द्यायची आहे. जर तुम्ही हे नाही केले तर २८८ जागांवर मी सर्व जातीचे उमेदवार उतरून गोरगरिबांना निवडून आणणार. सर्व जातीधर्माचे लोक घेणार मग मी मागे हटणार नाही. त्यावेळी नाव घेऊन कुणाला पाडायचे हे सांगेन असा इशारा सत्ताधाऱ्यांना दिला.**

तसेच मुस्लीम, दलित, मराठा यांच्या लेकरांना त्यांचं नुकसान व्हावं असं वाटत नाही. वेगवेगळ्या समुहाचे हाल आहेत. धनगरांना फसवलं, मराठ्यांना फसवलं. आमचे वैर नाही. पण मी कार्यक्रम लावणार, गोरगरिबांना निवडून आणणार. ४-५ जाती एकत्रित आल्या तर १०० टक्के सत्ता आणेन. मग होऊ द्या ७-८ उपमुख्यमंत्री, एक मुस्लीम, एक धनगर, एक दलित, लिंगायत समाज सगळ्यांचा एक एक उपमुख्यमंत्री करू. शेतकऱ्यांचा उपमुख्यमंत्री झाला तर दणादण शेतकऱ्यांची कामे करतील. मी मैदानात उतरलो, तर गोरगरिबांच्या हाती सत्ता द्या, निवडून येणारे कसे काम करणार नाहीत ते मी बघतो असं आवाहनही जरांगेंनी जनतेला केले.

दरम्यान, मराठ्यांनी कधी जातीवाद केला नाही. त्यांच्या व्यासपीठावर बसणारे आज मला फोन करतायेत. समाजाचं काम सोडून मला इतर वेळ नाही. धनंजय मुंडे उपकार ठेवणारे आहेत असं वाटत होते. परंतु गेल्या २-३ दिवसांत मला त्यांच्या कार्यकर्त्यांकडून धमक्या येतायेत. ही परतफेड आहे का, पुढे विधानसभा आहे बघू. तुमच्या नेत्यांना राज्यात फिरायचंय लक्षात ठेवा. मराठा एकजूट आहे. अन्याय सहन करत नाहीत. मराठा आणि वंजारी यांच्यात काही झालं नाही यासाठी सलोख्याची भूमिका बहिण भावाने म्हणायला हवं होते. मराठी वंजारी कुठेच काही झाले नाही. हे दोन्ही एकत्रित राहिले तर त्यांचे राजकीय करिअर उद्ध्वस्त होत नाही. निवडणूक गेल्यावर तुम्ही आता गुरगुर करायला लागलाय. जे झालं असेल ते झालं, पुढे एकत्रित राहू असं आवाहन बहिण भावाने करायला हवं होते असा निशाणा जरांगे पाटलांनी धनंजय मुंडे-पंकजा मुंडे यांच्यावर साधला.

# लाचखोर खाडेंना पकडण्यासाठी विशेष पथक रवाना

## खाडेंच्या घराची झडती घेताना महागड्या वस्तू पाहून तपास अधिकाऱ्यांचे डोळे चक्रावले



प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : जिजाऊ मल्टीस्टेटमध्ये आरोपी न करण्यासाठी संबंधितांकडून एक कोटीच मागणी प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हरीभाऊ खाडे यांच्या विरोधात एसीबीने खासगी इसमामार्फत पाच लाख रुपयांची रक्कम घेतल्याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे. यातच आरोपी असलेले पोलीस निरीक्षक हरीभाऊ खाडे यांच्या मुसक्या आवळण्यासाठी विशेष पथक रवाना करण्यात आले आहे. यासह लाचेच्या रकमेतून खाडेनी कमावलेली संपत्ती त्यांच्यासाठीच मोठी अडचण ठरणार आहे. विशेष म्हणजे ज्यावेळेस खाडेंच्या घराची तपासणी करण्यात आली त्यावेळी महागड्या वस्तू पाहून तपास अधिकाऱ्यांचे सुद्धा डोळे चक्रावले.

### लाचेतून कमवलेल्या प्रॉपर्टीमुळे खाडे येणार अडचणीत

### हरामच्या पैशातून घरामध्ये खरेदी केल्या महागड्या वस्तू

बीड शहरामध्ये किरायाच्या घरात पोलीस निरीक्षक हरीभाऊ खाडे राहात होते. त्यांनी गैरमार्गाने एवढी मोठी प्रॉपर्टी व पैसा कमावला की तो पैसा कुठे खर्च करायचा हे सुद्धा त्यांना कळत नव्हते. ज्यावेळेस खाडे यांच्या बीड शहरातील घराची झडती करण्यात आली त्यावेळेस घरातील महागड्या वस्तू पाहून तपास अधिकाऱ्यांचे डोळेसुद्धा चक्रावले. एकीकडे दोन वेळच्या अन्नासाठीकाही लोक झगडत असल्याने दुसरीकडे अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांकडे मात्र गैरमार्गाने कमावलेली मोठी माया उघड होत आहे.

जिजाऊ मल्टीस्टेटमध्ये झालेल्या अफरातफरीनंतर अनेक ठेवीदारांची कोट्यवधी रुपये बँकेत अडकले आहेत. याप्रकरणी ठेवीदारांनी गुन्हा नोंद केलेला आहे. यातच जिजाऊ मल्टीस्टेटचे प्रमुख बबन शिंदे हे फरार आहेत. याच प्रकरणामध्ये एका व्यक्तीकडून आर्थिक गुन्हे शाखेचे हरीभाऊ खाडे यांनी एक कोटी दे नसता तुला या प्रकरणात आरोपी करेल अशी धमकी दिली होती. यानंतर संबंधित तक्रारदाराने तडजोडीअंती ३० लाख रुपये देण्याचे कबुल केले होते. यातीलच पाच लाखाची रक्कम घेताना हरीभाऊ खाडे यांच्या खासगी इसमाला गेल्या दोन दिवसांपूर्वी एसीबीने ताब्यात घेतले. या लाच प्रकरणी पोलीस निरीक्षक हरीभाऊ खाडे, हवालदार जाधवर, खासगी इसम जैन या तिघाविरोधात बीड शहर पोलीसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यातील फरार असलेले हरीभाऊ खाडे यांना पकडण्यासाठी विशेष पथक तैनात करण्यात आले आहे.

# आनंदाच्या सरी पोहोचल्या काही तासांच्या अंतरावर

## केरळसह राज्यात मान्सून वेळेवर दाखल होण्याचा अंदाज

मुंबई । प्रतिनिधी

भारतीय हवामान खात्याने नैऋत्य मान्सून आगमनचा अंदाज वर्तवला आहे. अनुकूल हवामान परिस्थिती असल्याने ६ जून रोजी कोकणात मान्सूनचे आगमन होणार असून, त्यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. नैऋत्य मान्सून दक्षिण अंदमान समुद्र, बंगालचा उपसागरातील काही भाग आणि निकोबारांच्या बेटांवर पुढील ४८ तासात दाखल होण्यासाठी अनुकूल वातावरण आहे. त्यामुळे केरळ आणि राज्यात देखील मान्सून वेळेवर

# ज्ञानराधावर माजलगावमध्ये दोन गुन्हे नोंद




प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : एकीकडे ज्ञानराधाने २१ मे पासून ठेवीदारांच्या ठेवी वापस देण्याचं आश्वासन शुक्रवारी गेलेल्या शिष्टमंडळाला दिले आहे तर दुसरीकडे आज शनिवारी ज्ञानराधावर माजलगावमध्ये दोन गुन्हे नोंद करण्यात आले आहे. यामध्ये एका गुन्ह्यात ३ लाख ८० रुपयांची फसवणूक तर दुसऱ्या गुन्ह्यात १ लाख १० हजार रुपयांची फसवणूक झाल्याप्रकरणी सुरेश कुटे यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. हा गुन्हा नोंद झाल्यामुळे सुरेश कुटेंच्या अडचणी वाढल्या असल्याचे दिसत आहे.

गेल्या सात महिन्यांपासून ज्ञानराधामध्ये जवळपास २४०० कोटींच्या ठेवी अडकल्या लाखो ठेवीदारांच्या ठेवी असून हे ठेवीदार गेल्या सात महिन्यांपासून ठेवी परत मिळतील या आशेवर आहेत. यामध्ये २१ मे ला तुमच्या ठेवी मिळण्यास सुरुवात होईल असे आश्वासन शुक्रवारी सुरेश कुटे व ठेवीदारांमध्ये झालेल्या बैठकीत सुरेश कुटेंनी दिले. २१ मे पैसे मिळतील अशी आशा ठेवीदारांना असली तरी दुसरीकडे मात्र सुरेश कुटेंवर आता गुन्हे नोंद होण्यास सुरुवात झाली आहे. आज सकाळी माजलगाव शहर पोलीस ठाण्यामध्ये सुरेश कुटे यांनी फसवणूक केल्याप्रकरणी दोन ठेवीदारांनी वेगवेगळे दोन गुन्हे नोंद केले आहेत. यामध्ये तीन लाख ८० हजार रुपये हा पहिला गुन्हा तर दुसऱ्या गुन्ह्यात एक लाख १० हजार रुपयांची फसवणूक झाल्याप्रकरणी दुसरा गुन्हा माजलगाव पोलीसात नोंद झाला आहे. हे दोन्ही गुन्हे नोंद झाल्यामुळे सुरेश कुटे यांच्या अडचणी वाढल्याचे दिसत आहे.

# सध्याच्या तीव्र पाणी टंचाईवर जिल्हाधिकार्यांनी तातडीने उपाय योजना करावी - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर



बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील तीव्र पाणी टंचाई पाहता टँकर प्रणाली मध्ये तात्काळ सुधारणा करून पाणी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी व सध्याच्या तीव्र पाणी टंचाईवर जिल्हाधिकार्यांनी तातडीने उपाय योजना करावी अशी मागणी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

बीड जिल्ह्यात सध्या तीव्र पाणी टंचाई सुरु असून शासना मार्फत टंचाई ग्रस्त गावांना टँकर द्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असून मंजूर टँकरची संख्या व टँकर द्वारे करण्यात येणार्या खेपा यात मोठ्या प्रमाणात तफावत आहे. टँकर मंजूर असलेली संख्या व मंजूर खेपा गाव निहाय टाकण्यात येत नाहीत. जी.पी.एस. प्रणाली टँकरला बसविण्यात आलेली नाही. त्यामुळे टँकरचे लोकेशन मिळत नाही. यामुळे पाणी पुरवठा करण्यात मोठ्या प्रमाणात गैर व्यवस्थापन निर्माण झालेले आहे. शासनाची सर्व यंत्रणा हि लोकसभा निवडणूकीत गुंतलेली असल्यामुळे पाणी टंचाई विभागावर दुर्लक्ष होत आहे. यामुळे नागरिकांना तीव्र पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. जनते बरोबरच ग्रामीण भागातील जनावरांनाही मोठ्या प्रमाणात पाणी लागते.

बीड शहरातही मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई निर्माण झाल्याने बीड शहरात २० ते २२ दिवसाला पाणी येत असल्याने पाणी वितरण प्रणालीत सुधारणा करणे आवश्यक आहे. बीड शहरातील पाणी पुरवठा हा किमान आठ दिवसाला करण्यात यावा. या बाबत नगर परिषद प्रशासनाला तातडीने सूचना देण्यात याव्यात व ग्रामीण भागातील टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा या बाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी. ग्रामीण भागात पाणी टंचाई दुर करण्यासाठी इंधन विहिरी घेणे आवश्यक आहे. परंतु इंधन विहिरींचे सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. पण वरिष्ठ व कनिष्ठ भुवैज्ञानिक यांच्या जागा रिक्त असल्यामुळे इंधन विहिरींचे सर्वेक्षण होत नाही. बीड जिल्ह्यातील प्रकल्पातील बुडित क्षेत्रात एम.आर.ई.जी.एस. अंतर्गत पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या करीता तातडीने विहिरी सुरु करण्यात याव्यात या करीता पंचायत समिती प्रशासनाला सुचना देण्यात याव्यात. तरी वरील सर्व बाबीवर तातडीने कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# घाटकोपरच्या दुर्घटनेतुन बीड नगरपालिका बोध घेणार का?

बीड । प्रतिनिधी

मुंबईत घाटकोपर येथे अनाधिकृत होर्डिंग्ज कोसळुन १४ नागरीकांना जीव गमवावा लागला या दुर्घटनेनंतर बीड शहरातील अनाधिकृत होर्डीगचा मुद्दा चर्चेत आला असुन राज्याच्या नगरविकास विभागाने जिल्हाधिकारी व नगरपालिका मुख्याधिकाऱ्यांना तातडीने पत्र काढल्यानंतर निता अंधारे बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांना जाग आली असुन शहरातील स्वच्छता निरीक्षकांची बैठक घेत शहरातील ६ होर्डिंग्ज चालकांना नोटीसा बजावण्याचे आदेश दिले असुन कारवाईसाठी ८ जणांची नियुक्ती केल्याचे समजते.बीड



### न्यायालयाच्या आदेशाचा अवमान, शपथपत्राद्वारे दिशाभूल कि पुन्हा येरे माझ्या मागल्या

शहरातील अधिकृत होर्डिग्जची संख्या ३८ असल्याचा नगरपालिका दावा करत असली तरी प्रत्यक्षात १०० पेक्षा जास्त अनाधिकृत होर्डिग्ज दिसून येत आहेत.शहरातील ईमारतीवर नगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता आणि कुठलेही स्ट्रक्चरल आडीट न करताच धोकादायक होर्डिग्ज लावण्यात आले आहेत.सामाजिक कार्यकर्ते यांनी वारंवार निवेदने तसेच आंदोलनानंतर सुद्धा केवळ २-४ होर्डिग्ज काढुन कारवाई केल्याचे नाटक नगरपरिषद प्रशासन करत असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे त्यामुळे घाटकोपर येथील अनाधिकृत होर्डिग्ज कोसळुन १४ जण मृत्युमुखी पडलेल्या दुर्घटनेनंतर तरी बीड नगरपरिषद प्रशासन बोध घेईल का?? कि नेहमी प्रमाणेच केवळ कारवाईचे नाटक करते हे पाहणं औत्सुक्याचे ठरेल तसेच या होर्डिग्ज वरील जाहिरातीचा महसूल कोण गोळा करतं? या माध्यमातून शासनाचा महसूल बुडवुन कोणाची तिजोरी भरली जाते हा देखील संशोधनाचा विषय आहे असे मत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे

## अवयवदान प्रबोधनाची चळवळ

शरीरातील केवळ कोणता तरी महत्त्वाचा अवयव निकामी झाल्यामुळे मृत्यूशी निकराची झुंज देत असलेली व्यक्ती अनेकांच्या पाहण्यात येत असते. जीवनातील शेवटची घटका मोजत असलेले असे हजारो रुग्ण आपल्या आसपास आहेत की, ज्यांच्या डोळ्यांदेखत अवयव देऊ करणारा दाता दिसत असूनही त्यांना त्यांचे प्राण वाचविता येत नाहीत. लोकसंख्येच्या बाबतीत जगात पहिला असणारा एकशे चाळीस कोटींचा भारत देश अवयवदानात मात्र जगात शेवटून दुसरा असावा ही एक शोकांतिका म्हणता येईल. ही वस्तुस्थिती दूर व्हावी या उद्देशाने देशात अनेक व्यक्ती व संस्था अवयवदान या विषयात झटून कार्यरत आहेत. मात्र त्यांचे कार्य एकसंध व्हावे, त्यांना त्यांच्या कार्यात येणाऱ्या सरकारी तसेच इतर प्रकारच्या अडचणी दूर व्हाव्यात, अवयवदान व देहदान या संदर्भातील लोकप्रबोधनाच्या कामाला मोठी चालना मिळावी याकरिता या सर्व लहान-मोठ्या संस्था एका धाग्याने बांधून या चळवळीला व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न फेडरेशन ऑफ ऑर्गन अँण्ड बॉडी डोनेशन या संस्थेने महाराष्ट्रात आणि त्याचबरोबर देश पातळीवरही सुरू केला आहे. फेडरेशनची १७ मे २०१५ रोजी स्थापना करण्यात आली आणि २०१७ मध्ये, बरोबर दोन वर्षांनी १७ मे रोजीच फेडरेशन ऑफ ऑर्गन अँण्ड बॉडी डोनेशन, मुंबई या नावे ही संस्था धर्मादाय आयुक्तांकडे नोंदविली गेली. यंदा ती आपला नववा वर्धापन दिन साजरा करीत आहे. ठाणे जिल्ह्यातील वसईसारख्या विकसित भागात आपल्या "देहमुक्ती मिशन" या संस्थेच्या माध्यमातून अवयव व देहदान या क्षेत्रात अनेक वर्षे काम करणारे संस्थापक पुरुषोत्तम पवार यांना, त्यांना आलेल्या प्रदीर्घ अनुभवातून, एका व्यापक संस्थेची म्हणजेच महासंघाची निकड भासू लागली होती. त्यामुळे त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे आणि त्यांच्या दूरदर्शी प्रयत्नांमुळे 'दि फेडरेशन ऑफ ऑर्गन अँण्ड बॉडी डोनेशन' ही संस्था स्थापन झाली. रक्तदान याविषयी जनमानसात चांगल्या प्रकारे प्रबोधन झालेले आहे. त्यामुळे रक्तदानासाठी स्वतः होऊन पुढे येणारे दाते आज उपलब्ध होत असतात. विविध मंडळे, सामाजिक, राजकीय संस्थांकडून रक्तदानाचे कार्य बऱ्यापैकी सुरू आहे; परंतु नेत्रदान, त्वचादान, अवयवदान, देहदान करण्याची एखाद्या व्यक्तीची इच्छा असूनदेखील प्रत्यक्षात ते करण्याची वेळ येते, त्यावेळी ती व्यक्ती तेथे हयात नसते. तर तिथे असते त्याचे मृत शरीर. अशा वेळी त्याच्या जवळच्या नातेवाइकांची, कुटुंबातील व्यक्तींची भूमिका महत्त्वाची ठरते. अशा अत्यंत हळव्या किंवा भावनोद्दीपक अवस्थेत मृताच्या आप्तजनांना अवयव वा देहदानाची जाणीव करून देणे हे मोठे संयमाचे व जोखमीचे काम असते. अशातही जनजागृती करणाऱ्या अनेक व्यक्ती व सामाजिक संस्था सर्वस्व झोकून काम करत आहेत. आपापल्या कक्षेत काम करताना त्यांना विविध अडचणी येतात; त्या अडचणींवर मात करण्यासाठी त्यांचे प्रयत्न देखील अपुरे पडतात. फेडरेशनचे संस्थापक पुरुषोत्तम पवार यांनी चळवळीची ही अडचण अनुभवली होती. त्यामुळे त्यांनी अनेक व्यक्ती व संस्थांच्या प्रमुखांना वारंवार भेटून या अडचणींवर तोडगा काढण्यासाठी आपण एकत्र येणे कसे गरजेचे आहे हे समजावून सांगितले. तसेच पुढाकार घेत मुंबई येथे सर जे. जे. हॉस्पिटलमध्ये देहदानाचे कार्य करणाऱ्या सर्व सामाजिक संस्थांची बैठक बोलावली आणि एकमुखाने महासंघाची मुहूर्तमेढ रोवली. फेडरेशनच्या छत्राखाली सर्व स्थानिक संस्थांनी एकत्र येऊन एकमेकांशी समन्वय साधत कार्य सुरू केल्याचे अनेक फायदे दिसू लागले. केवळ मुंबई शहर आणि उपनगरे यांच्यापर्यंतच संगठन मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रभर हे कार्य विस्तारण्याच्या दृष्टीने राज्यातील जवळपास सर्व जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांशी संपर्क साधत कार्याची घोडदौड चालू ठेवली. फेडरेशनची स्थापना करताना आरोग्य क्षेत्रात मोठी रुग्णसेवा देणारे हरकचंदजी सावला यांना प्रथम अध्यक्षपदाचा मान दिला गेला, तर संस्थापक पुरुषोत्तम पवार यांच्या बरोबरीने सुधीर बागाईतकर, विनोद हरिया, कुलीनकांत जी लुठीया, विनायक जोशी आदींप्रमाणेच दधीची देहदान समिती, मानव ज्योत, जीवन ज्योत, सुमती ग्रुप अशा प्रस्थापित सेवाभावी संस्थांच्या कार्यकर्त्यांनी देखील फेडरेशनच्या उभारणीचे मोलाचा भार उचलला. कार्यकर्ते नेटाने कामाला लागले. महाराष्ट्रातील सर्व सक्रिय कार्यकर्त्यांना एका मंचावर आणून त्यांच्या अडीअडचणी समजावून घेण्यासाठी २०१६ मध्ये महाराष्ट्र सेवा संघ मुलुंड, मुंबई येथे अवयवदान क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन यशस्वी रीतीने आयोजित केले गेले. त्यापासून या कामात महाराष्ट्र सेवा संघाचे अनमोल सहाय्य लाभले ते आजतागायत. या अधिवेशनात सुप्रसिद्ध युरॉलॉजिस्ट डॉक्टर वत्सला त्रिवेदी, तसेच डॉक्टर प्रवीण शिनगारे, नागपूरचे चंद्रकांत मेहेर आदी अनेक मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले. भारतात ज्यांच्यावर २००३ मध्ये पहिले यशस्वी यकृत प्रत्यारोपण झाले होते, असे नाशिक येथील डॉ. भाऊसाहेब मोरे यांना प्रमुख पाहुणे म्हणून पाचारण करण्यात आले होते. संमेलनाच्या या यशानंतर महाराष्ट्रातील अनेक ठिकाणचे कार्यकर्ते फेडरेशनशी जोडले गेले. बाबा आमटे यांच्यापासून प्रेरणा घेऊन अवयवदानाच्या प्रचारासाठी पदयात्रा काढणारे नाशिक येथील सुनील देशपांडे यांना त्यांच्या पदयात्रेसाठी फेडरेशनने संपूर्ण सहकार्य केले. या पदयात्रेद्वारे नाशिक ते आनंदवन (नागपूर मार्गे) या मार्गावर उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भ पायाखाली घातला जाऊन परिसरात अवयवदानाबाबत प्रबोधनाचे कार्य केले गेले. ही पहिली पदयात्रा पूर्ण झाल्यानंतर फेडरेशनतर्फे कोकण आणि महाराष्ट्राची सीमा ओलांडत मडगाव गोव्यापर्यंत दुसऱ्या पदयात्रेचे यशस्वी आयोजन केले गेले. त्यानंतर तिसऱ्या पदयात्रेदरम्यान औरंगाबाद, बीड, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, तुळजापूरपर्यंत संपूर्ण मराठवाडा पालथा घातला गेला. त्यानंतर नाशिक ते कर्नाटकातील थेट बेळगावपर्यंत चौथी पदयात्रा आयोजित करून पश्चिम व दक्षिण महाराष्ट्र पायाखाली घातला गेला, तर गेल्या फेब्रुवारी महिन्यात फेडरेशनतर्फे उत्तर महाराष्ट्राच्या ग्रामीण आदिवासी जिल्ह्यांमधून पाचव्या खान्देश अवयवदान प्रबोधन रथयात्रेचे आयोजन केले गेले. त्या दरम्यान धुळे, नंदुरबार आणि जळगाव जिल्ह्यातील शहरी आणि आदिवासी भाग पिंजून काढत अवयवदानाच्या प्रबोधनाचा धमाका उडवून दिला गेला. चार पदयात्रा आणि रथयात्रेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्र व शेजारच्या प्रदेशात अवयवदान प्रबोधनाचा झेंडा रोवताना फेडरेशनच्या कार्याचा ठसा उमटवला गेला. छोट्या छोट्या गावातून आणि मोठ्या शहरात असलेल्या अनेक कार्यकर्त्यांना फेडरेशनच्या कार्यामध्ये सहभागी करण्यात आले. महासंघ वाढीस लागला. चौथी पदयात्रा पूर्ण झाली आणि एक महिन्यातच लॉकडाऊन सुरू झाला. अवयवदान क्षेत्र अधिक संवेदनशील असल्यामुळे या कार्याला शंभर टक्के कोरोनाची खीळ बसली. अवयवदानाची चळवळ ठप्प झाली असे वाटत असतानाच, फेडरेशनने झूम मीटिंग, गुगलमीट व वेबीनार अशा अनेक ऑनलाइन कार्यक्रमांचा सपाटा चालू ठेवत चळवळ जागती ठेवली, बोलती ठेवली. फेडरेशनचे हे कार्य असेच यशस्वीपणे पुढे पुढेच आपण नेणार आहोत, असा आत्मविश्वास आज प्रत्येक कार्यकर्त्याच्या रोमारोमात तयार झालेला आहे. (लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

# होर्डिंग काळ बनून येतो तेव्हा...

प्रसिद्धीचे एक माध्यम म्हणून अवाढव्य होर्डिंग उभे करण्याचा पायंडा पडला आणि कालौघात तो अस्ताव्यस्त पसरला. मात्र आधी पुणे आणि त्यानंतर घाटकोपरमधील घटनेने अनधिकृत आणि अजस्त्र होर्डिंगचा धोका किती मोठा आहे, हे दाखवून दिले. त्यापासून धडा घेत भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आता तरी या संबंधीची निश्चित नियमावली आणणे आवश्यक आहे. त्यासाठी यंत्रणा कार्यरत असायला हवी. घाटकोपर येथील होर्डिंग कोसळण्याची घटना आपल्या सुरक्षेचे संकट किती गंभीर आहे, हे दाखवून गेली. अवकाळी पावसाने मुंबईतील छेडानगरच्या पेट्रोल पंपावळील हे महाकाय अनधिकृत होर्डिंग कोसळले आणि त्याखाली माणसांबरोबरच बरीच वाहने दबली जाऊन काहींनी जीव गमावला, तर बरेचजण खाली अडकून पडले. मुख्य म्हणजे लोहमार्ग पोलीस कर्मचारी वसाहतीच्या जागेवरील हे अनधिकृत होर्डिंग हटवण्यासाठी मुंबई महापालिकेने अलीकडेच जाहिरातदारांना नोटीस बजावली होती. त्यामुळेच याची दखल घेऊन वेळीच योग्य कारवाई झाली असती, तर मोठी जीवितहानी टळली असती. मात्र आपल्याकडील ढिसाळ यंत्रणेकडून ही अपेक्षा ठेवणे अयोग्य आहे. काही वर्षांपूर्वी पुण्यातही अशाच पद्धतीने एक होर्डिंग कोसळून त्याखाली दबल्यामुळे पाच जणांचा मृत्यू झाला होता. त्याखाली अडकल्यामुळे काही वाहनांचेही मोठे नुकसान झाले होते. या अपघाताचे व्हीडिओ आजही अनेकांना आठवत असतील. घाटकोपरमध्ये वादळी वाऱ्यामुळे तशाच घटनेची पुनरावृत्ती घडली. अशा या घातक पद्धतीने होर्डिंग उभारणाऱ्यांवर आता तरी कारवाई होणार का, हा प्रश्न पडतो. यानिमित्ताने मांडावासा वाटणारा पहिला मुद्दा म्हणजे होर्डिंगसाठी एक वेगळे धोरण असणे गरजेचे आहे. मुख्य म्हणजे त्यात घालून दिलेल्या नियमांचे काळजीपूर्वक आणि आग्रहाने पालन झाले पाहिजे. मग ते होर्डिंग महापालिकेच्या जागेत असो, रेल्वेच्या जागेत असो वा अन्य कोणाचे असो; अशा प्रत्येक होर्डिंगसाठी हे नियम आवश्यक आहेत. पुण्यातील होर्डिंग दुर्घटनेबाबत बोलायचे तर ते रेल्वेच्या जागेत होते. त्यामुळे महानगरपालिकेने याचा आमच्याशी काही संबंध नाही, असे म्हणत हात झटकले. मात्र हे काही या समस्येवरचे उत्तर असू शकत नाही. जबाबदारी कोणी ना कोणी स्वीकारायलाच हवी. म्हणून सर्वंकष धोरणांचा अवलंब होणे गरजेचे असून त्यात सर्वाधिक महत्त्वाचा मुद्दा संरक्षणाचा असायला हवा. सुरक्षा आणि संरक्षणासंबंधीचे हे निकष त्या त्या संबंधित यंत्रणेने घालून दिले पाहिजेत आणि त्याच्या अंमलबजावणीकडेही लक्ष ठेवले पाहिजे. म्हणजेच एखाद्या कॉन्ट्रॅक्टरने सुरक्षा आणि संरक्षणाचे निकष वा नियम ठरवून चालणार नाही. कारण ते नेहमीच आपल्या सोयीचे नियम ठरवणार. म्हणूनच हे नियम ठरवणारी यंत्रणा देशपातळीवर कार्यरत असणे ही काळाची गरज आहे, असे म्हणावे लागेल. अशी एखादी यंत्रणा असेल तर तिचे निगुतीने पालन झाले पाहिजे. तरच यापुढे अशा दुर्घटना घडण्याची शक्यता कमी होईल. अशा दुर्घटना घडल्यानंतर दर वेळी तात्पुरती कारवाई केली जाते. मात्र काही काळातच तो विषय मागे पडतो. नुकसानभरपाई द्या आणि विषय संपवा, असाच यामागचा एकूण विचार असतो. अवकाळी, वादळ वा तीव्र वारे असताना लोक झाडे वा मोठ्या होर्डिंगच्या आडोशाला उभे राहतात आणि अशा दुर्घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात जीवितहानी होते. ही समस्या वा वास्तव लक्षात घेऊन यापुढे तरी होर्डिंग उभारताना त्याची मापे काय असावीत, त्याला आधार देणाऱ्या घटकांचे वा साहित्याचे मोजमाप आणि प्रकार कोणता असावा, त्यांचा दर्जा कसा असावा, इथपर्यंतच्या सगळ्या गोष्टींचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. तरच अशा घटनांची पुनरावृत्ती



टळू शकेल. अन्यथा, वारंवार अशा घटना पाहायला मिळतील, यात शंका नाही. होर्डिंग पॉलिसी ठरवताना ती कुठे असावी, दोन होर्डिंगमध्ये नेमके किती अंतर असावे याचादेखील विचार व्हायला हवा. या दृष्टीने अन्य देशांमधील स्थिती पाहिली तर मुळात तिथे इतक्या मोठ्या संख्येने आणि जागोजागी होर्डिंग नसतात. असतात ती साधारणत: हमरस्त्याच्या कडेला असतात. म्हणजेच हा भाग थेट रहदारीच्या, वर्दळीच्या जागेपासून पुरेशा सुरक्षित अंतरावर असतो. त्यामुळेच चुकून एखादे होर्डिंग पडले तरी ते रस्त्यावर येत नाही. बाजूच्या मोकळ्या जागेत पडू शकते. स्वाभाविकच परदेशामध्ये अशा दुर्घटना घडल्या तरी जीवितहानी होण्याची शक्यता नगण्य वा बरीच कमी असते. तिथे माणसाच्या जीवाला मोठी किंमत असते. उलटपक्षी, आपल्याकडे हा विचारही केला जात नाही. आपल्याकडे माणसाचे आयुष्य हीच एक सर्वात स्वस्त बाब झाली आहे. म्हणूनच आपण या बाबतीत अजून कित्येक योजने मागे आहोत, हे समजून घ्यायला हवे. आपल्याकडेही हायवेवर अनेक होर्डिंग बघायला मिळतात. पण ती रस्त्यावर नसतात. बाजूला असतात. त्यामुळेच त्यातील एखादे पडले तरी रस्त्यावर येणार नाही, हे पाहिले जाते. मात्र शहरात हा नियम पाळला जात नाही, कारण गर्दीच्या भागात त्यासाठी पर्याप्त जागाच उपलब्ध नाही. खेरीज होर्डिंग लावण्यामागील मुख्य उद्देश तो लोकांच्या सहज नजरेस पडावा असा असतो. त्यामुळे शहरी भागांमध्ये तो आडबाजूला वा रस्त्यापासून बऱ्याच दूरवर लावूनही परिणाम साधणार नाही. म्हणूनच मग लोकांना कुठूनही सहज दिसतील आणि त्यांचे लक्ष वेधून घेतील अशी जागा हेरून ही महाकाय होर्डिंग्ज उभारली जातात. मात्र योग्य जागेअभावी अशी अजस्त्र होर्डिंग नेहमीच संभाव्य दुर्घटनेची आशंका जागी ठेवतात. हे टाळण्यासाठी आधी रहिवासी वा गर्दीच्या भागातील होर्डिंगचा आकार किती असावा, हे सुनिश्चित असणे आवश्यक आहे.

ताजी घटना होर्डिंगचे वाढलेले प्रचंड प्रमाण दर्शवणारी आहे. पुण्यातील दुर्घटनेवेळी देखील हाच मुद्दा समोर आला होता. म्हणूनच यापुढे होर्डिंगचा आकार किती असावा याबाबतच्या नियमांमध्ये अधिक स्पष्टता यायला हवी. खेरीज ते उभे केले जाणार असणाऱ्या भागातील वातावरण, तेथील समस्या या सगळ्यांची माहिती घेऊन नियम ठरवायला हवे. खेरीज आधी उल्लेख केल्याप्रमाणे दर काही कालावधीनंतर त्याची तपासणी होणेही गरजेचे आहे. अशा तपासणीमध्ये स्क्रू ढिले झाले आहेत का, मजबुती देण्यासाठी वापरण्यात आलेले साहित्य मूळ जागेपासून हलले आहे का, या साहित्याला गंज वा यांसारखा अन्य धोका निर्माण झाला आहे का, अशा अनेक गोष्टींची माहिती मिळू शकते. हे सगळे नीट असल्याचे बघण्याची जबाबदारी केवळ त्या ठेकेदाराची नाही, तर या सगळ्याचे नियमन करणाऱ्या यंत्रणेवरही असली पाहिजे. हवे तर यासाठी काही शुल्क आकारण्यासही हरकत नाही. मात्र या यंत्रणेतल्या लोकांनी तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. शेवटी ठेकेदार वा होर्डिंग उभारणारे कधीच आपल्या चुका मान्य करणार नाहीत वा पुरेशा काळजीपूर्वक तपासणीही करणार नाहीत, हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. मात्र एखाद्या जबाबदार यंत्रणेकडून तपासणी झाली तर कच्चा दुवा शोधणे शक्य होईल. आतासारखीच पुण्यातील होर्डिंग दुर्घटनेनंतर बरीच चर्चा झाली होती. मात्र त्यानंतर आजपावेतो अशा घटना रोखण्यासाठी एकही पाऊल उचलले गेलेले नाही. खरे तर त्या घटनेनंतर सविस्तर विश्लेषण होऊन दोषींना शिक्षा होण्यापर्यंतची पावले उचलली जाणे अपेक्षित होते. मात्र तसे काही घडल्याचे ऐकिवात नाही. साहजिकच काही दिवसांनी लोक अशा घटना विसरून जातात. पुढच्या वेळी तशीच घटना घडते, तेव्हाच त्याचे स्मरण होते. म्हणूनच आताच्या ताज्या घटनेची तरी संपूर्ण आणि सखोल चौकशी व्हायला हवी आणि दोषींना कठोर शिक्षाही व्हायला हवी. हे प्रकरण शेवटपर्यंत व्यवस्थित हाताळले गेले, तरच भविष्यात काही सुधारणा दिसून येईल. अन्यथा परिस्थिती बदलणार नाही.

पान १/४ वरून

## घराची वाटणी मागितलीस

धमकी मला दिली. वरील चौंघांनी जिवे मारण्याची धमकी दिली आहे. अशा प्रकारची फिर्याद शहर पोलिस ठाण्यात दाखल झाली असून पुढील तपास पोलिस जमादार आरसुळ हे करीत आहेत.

आळंदी येथील मंदिरात सेवा करून भागविते उपजिविका

माझे पती मुरलीधर जाधव यांचे १५ वर्षापुर्वी निधन झाल्यानंतर मी माझ्या मुलीसह आळंदी येथील एका मठामध्ये वास्तव्यास गेले. तेथील मठाधिपतींना माझी परस्थिती सांगीतल्यानंतर त्यांनी साफ सफाईचे काम मला दिले. या कामातून मिळणार्या तुटपूंज्या पैशातून माझ्या कुटूंबाचा उदरनिर्वाह भागविला. या मोल मजुरीतूनच मिळालेल्या पैशातूनच मुलीचा विवाह देखील करून दिला. परंतु माझ्या नवर्याच्या नावाने अंबाजोगाई येथील असलेल्या जागेतील वाटणी मागीतली असता त्यांनी मला जिवे मारण्याची धमकी दिल्यामुळे मी कायदेशिर बाजूने न्याय मागीतला आहे. कायद्यातून न्याय मिळाला नाही तर माझ्या कुटूंबासह बेमुदत आंदोलन करणार असल्याचे तक्रारदार जनाबाई जाधव यांनी सांगितले.

दोन दिवसांच्या शिळ्या भाकर्या घेवून पिडीत महिलेने पोलिसांकडे मागीतला न्याय

दोन दिवसांपुर्वी आळंदी येथून आलेल्या महिलेने मठात मिळालेल्या भाकरी घेवून अंबाजोगाईचे शहर पोलिस ठाणे गाठले या भाकरीवर तीने दोन दिवस काढले. पोलिसांनी या महिलेची हाकीकत जाणल्यानंतर लागलीच सदरील आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला परंतु पोलिस या महिलेला न्याय देतील का? हे पहावे लागेल. पोलिस ठाण्याचे एफआयआर प्रत घेवून मिडीयाकडे आली असता त्यांनी दोन दिवसांचे शिळे तुकडे दाखविल्यामुळे या घटनेचे गांभीर्य मिडीयाला लक्षात आले या प्रकरणात पोलिस कितपत न्याय देतात हे पहावे लागेल.

## संत बंकटस्वामी महाराज

खेळाने लक्ष वेधून घेतले..

आठ दिवस होणाऱ्या या भव्य पुण्यतिथी उत्सवात राष्ट्रिय भागवत कथाकार गोवत्सल राधाकृष्ण महाराज जोधपुर यांच्या रसाळ वाणीतून कथा संपन्न होत आहे..कीर्तन,भजन,हरिपाठ या अध्यात्माच्या ज्ञानाबरोबर जनप्रबोधनाची मोठी रेल चेल असणार आहे.महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक,वादक तसेच बंकटस्वामी फडावरील सर्व वारकरी मंडळींची उपस्थिती राहणार आहे. सर्व कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन बंकटस्वामी संस्थानच्या वतीने महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले आहे.

संत बंकटस्वामी महाराज संस्थान वर १२० २०० फुटाचा तब्बल २४ हजार स्कवेअर फुटाच्या भव्य किर्तन भवनाचे बांधकाम प्रगती पथावर आहे. महादेव महाराज चाकरवाडीकर,श्री ह भ प महंत हरिहर भारती महाराज,श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे , श्री ह भ प महादेवानंद भारती. श्री ह भ प तुकाराम महाराज भारती, यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न झाले यावेळी जोग महाराज वारकरी कीर्तनभवनाने बंकटस्वामींच्या आध्यात्मिक वैभवात भर पडेल असा विश्वास महादेव महाराज तात्या यांनी व्यक्त केला.

## प्रसार माध्यमांच्या दणक्याने

या कडे वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देणार का? अशी विचारणा केली जात होती. तसेच तात्काळ रोहित्र बसविण्यात यावे अशी मागणी जनसामान्यातून व नागरिकांतून होत होती. यासंदर्भात माध्यमांनी बातमी प्रसारित केली होती, याचा इफेक्ट म्हणुन शुक्रवार रोजी तात्काळ विलंब करण्यात आलेले रोहीत्र बसविण्यात आले प्रलंबित काम तात्काळ झाल्यामुळे सदरील नागरिकांतून प्रसार माध्यमांचे कौतुक होत आहे.

## भिमजन्मभूमीच्या विकासासाठी

पान १/४ वरून

करण्यात आला. या सत्कार समारंभास प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यीक अमर हबीब बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र साहित्य परिषद अंबाजोगाईचे अध्यक्ष दगडू लोमटे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, ज्येष्ठ साहित्यीक अमर हबीब, प्रा.डॉ.कमलाकर कांबळे, आधार मल्टीस्टेटचे अध्यक्ष ॲड.सुनिल सौंदरमल, डॉक्टर संघटनेचे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे, स्वाराती रूग्णालयाचे मेडीसीन विभाग प्रमुख डॉ.सिद्धेश्वर बिराजदार, दंत वैद्यक परिषदेचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे, प्रा.डी.जी.धाकडे उपस्थित होते. यावेळी बोलताना अमर हबीब म्हणाले की, डॉ.राहुल धाकडे यांचे सर्वच क्षेत्रात मौलीक योगदान आहे. सर्वगुण संपन्न असणारे हे नेतृत्व सर्वच पातळ्यांवर यशस्वी ठरले आहे. कोणतेही काम हाती घेतल्यानंतर त्या कामात स्वतःला झोकून देवून काम करण्याची त्यांची भूमीका त्यांना पुढे घेवून गेली. जसा त्यांनी आपल्या कार्याचा ठसा वैद्यकीय सेवेत उमटविला त्याच पद्धतीने सामाजिक, धार्मिक, साहित्यीक, क्रीडा, सांस्कृतीक क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. या आष्टपैलु नेतृत्वाला भिमजन्मोभूमीच्या कार्यकारीणीवर निवड झाल्याने अंबाजोगाईकरांची मान उंचावली आहे. आगामी काळात त्यांना अनेक संधी उपलब्ध असल्याची अमर हबीब यांनी सांगितले. यावेळी नंदकिशोर मुंदडा, राजकिशोर मोदी, डॉ.सिद्धेश्वर बिराजदार, डॉ.नरेंद्र काळे, डॉ.नवनाथ घुगे, ॲड.सुनिल सौंदरमल यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समोराप दगडु लोमटे यांनी केला. यावेळी डॉ.धाकडे यांनी आपण अंबाजोगाईची मान कायम उंचावेल असेच कार्य करणार असल्याचे उपस्थितांनसमोर सांगितले. यावेळी सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ.राहुल धाकडे यांचा भिमजन्मभूमीची प्रतिकृती, शाल, श्रीफळ, सन्मानपत्र देवून गौरव करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुजीब शेख यांनी केले तर संचलन आनंत कांबळे यांनी व उपस्थितांचे आभार भिमाशंकर शिंदे यांनी मानले. या कार्यक्रमास मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## भगवंताने माणसाला चांगले

माध्यमातून पिंपळवंडी साठवण तलाव व बेदरवाडी धरणासाठी प्रयत्न करून दोन्हीही तलावामुळे येथील शेतकऱ्यांची हरितक्रांती झाल्याचे चित्र पाहवयास मिळत आहे.तसेच शेतकऱ्यांनी शेतीत विविध जातीच्या फळांची लागवड करून कष्ट व मेहनत केली तर शेतीत उत्पादन घेता येते असे मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांसाठी इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सुरू करून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गैरसोय दूर केली.तसेच श्री क्षेत्र पंढरपूर येथे भव्य- दिव्य मठ स्थापन करून वारकऱ्यांची निवाऱ्याची सोय केली आहे.मठ परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा व मंदिर बनवले आहे.तसेच महाराष्ट्रात कोठेही पाहायला मिळणार नाही असे या ठिकाणी साडेअकरा टन वजनाची महाशिव पिंड व साडेसात फूट उंचीचे शिवलिंग बनविले आहे.त्याचप्रमाणे संत गाडगेबाबा,तुकडोजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले आदींच्या मूर्ती स्थापन करण्यात येऊन पंढरपूरच्या मूर्ती स्थापनेचा सोहळा लाईव्ह करण्याचा मनोदय त्यांनी यावेळी व्यक्त केला.या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील आजी-माजी सरपंच,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,चेअरमन,पत्रकार तसेच पिंपळवंडी, अंमळनेर,कोतन, भडकेल, खोपटी,पांगरी,कुसळंब, नाळवंडी, डोंगरकिन्ही,पाटणसांगवी, लिंबागणेश, सुपा, चापडगाव,आंतरवली आदी गावातील व पंचक्रोशीतील भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच भाविक-भक्तांनी महाप्रसादाचा व ह.भ.प.अमृत जोशी महाराज यांच्या किर्तनाचा लाभ घेतला.

## घाटकोपरच्या दुर्घटनेतुन

पान १/४ वरून

लिंबागणेशकर यांनी व्यक्त करत कायमस्वरूपी कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

बीड शहरातील अनधिकृत होर्डिग्जची ठिकाणे

बीड शहरातील बंजारा हॉटेल, एसपी आफिस समोर,सारडा कपिटल कार्नर ,सेंन्ट अन्स स्कुलसमोर,शिवराज पान सेंटरच्या वर,केएसके कालेज समोर,नगरनाका महाराष्ट्र ग्रामीण बँकेसमोर,बंब सर्कल हिरालाल चौक, अक्षरधाम, बीड पंचायत समिती समोर,बालेपीर, बार्शी नाका चौक,जुने मारूती शोरूम,इंडीयन आईल पेट्रोल पंप बार्शी रोड, मुक्ता लान्स अशा विविध ठिकाणी १०० पेक्षा जास्त ठिकाणी अनाधिकृत होर्डिग्ज लावण्यात आलेली आहेत.तसेच बीड शहरातील महत्त्वाचे चौक, दुभाजक याठिकाणी लहानमोठे अनाधिकृत होर्डिग्ज लावण्यात आलेले असुन ते अपघाताला निमंत्रण देत आहेत.

न्यायालयाच्या आदेशाचा आणि दाखल शपथपत्र यांचा नीता अंधारे मुख्याधिकारी नगरषरीषद यांच्या कडुन अवमान :- डॉ.गणेश ढवळे

बेकायदा होर्डिग्ज,बनर, पोस्टर्स ,कमानी व जाहिराती हटवण्यासाठी काय पावले उचलण्यात आली याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारसह राज्यातील महापालिका आणि नगरषरीषदसह सर्वच नागरी संस्थांना दिलेले आहेत .सन २०१७ च्या निकालात मुंबई उच्च न्यायालयाने हे मान्य केले आहे की बेकायदेशीर होर्डिग्ज वर कारवाई करणे तसेच गुन्हेगारांविरूद्ध गुन्हेगारी कायद्याची अंमलबजावणी करताना राजकीय वर्गाच्या सहभागामुळे महापालिका अधिकारी आणि पोलीस अधिकारी यांचे काम खुप कठीण होताना दिसत आहे.मात्र असे असताना बेकायदेशीर होर्डिग्ज, बनर,कमानी व अशा प्रकारच्या आकाश चिन्हांच्या माध्यमातून शहराचे होणारे विद्रुपीकरण थांबवावे अशी उच्च न्यायालयाची इच्छा असल्याने सन २०२२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि राज्यातील सर्वच नागरी संस्थांना कारवाईचे निर्देश दिलेले आहेत.ज्यात महापालिका आणि नगरपरीषदांचा समावेश आहे.बेकायदेशीर होर्डिग्ज,बनर , पोस्टर्स, कमानी काढुन टाकण्यासाठी केलेल्या उपाय योजनांचा अहवाल सादर करा तसेच बेकायदा होर्डिग्जची यादी आणि कायदेशीर होर्डिग्ज मधुन किती महसूल मिळतो याची माहिती असलेले प्रतिज्ञापत्र दाखल करा असे निर्देश उच्च न्यायालयाने दिले होते.न्यायालयाचे आदेश असतानाही संबंधित यंत्रणा अंमलबजावणी करत नसुन कर्तव्यात कसूर करत असल्याचे दिसून येते.बीड नगरपालिकेचे तत्कालीन मुख्याधिकारी उमेश ढाकणे यांनी जुन २०२२ मध्ये शपथपत्र दाखल केले होते.मात्र तरीही अद्याप अनाधिकृत होर्डिग्ज प्रकरणात कारवाई झाल्याचे दिसून येत नाही.व्यावसायिक जाहिरात दारांनी शहराचे मोठ्या प्रमाणावर विद्रुपीकरण केले असून सामाजिक कार्यकर्ते यांच्या तक्रारीनंतर कारवाई तर सोडाच साधे होर्डिग्ज हटवण्याची तसदी सुद्धा नगरपरिषद प्रशासन घेताना दिसत नाही.

चमकोगिरी करणाऱ्यांच्या वाढदिवसाच्या आणि शुभेच्छा होर्डिग्ज मुळे वाहतुकीस अडथळा,अपघाताला निमंत्रण

बीड शहरात चमकोगिरी करणारांची मोठ्या प्रमाणावर खोगीरभरती असुन शहरातील मुख्य चौक मुख्य रस्त्यांवरही जयंती,उत्सव ,सण, आंदोलने, वाढदिवस आदी कार्यक्रमांचे सर्रास बनर लावले जातात. तसेच मुख्य रस्त्यांवरील दुभाजकांमध्येही बनर उभे केले जातात.अनेकदा हेच बनर हवेने खाली पडुन अपघात घडल्याच्या घटना घडलेल्या आहेत.याचा फटका सर्वसामान्यांना , वाहनधारकांना बसतो.त्यांना अनंत अडचणींचा सामना करावा लागतो.नगरपालिकेने विशेष मोहीम राबवुन अनाधिकृत बनर लागणार नाहीत याची काळजी घेणं आवश्यक आहे.मात्र नगर पालिका जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहे.

## आनंदाच्या सरी पोहोचल्या

दाखल होण्याचा अंदाज आहे.

ने यापूर्वी १९ मे पर्यंत मान्सून दक्षिण अंदमान समुद्रात दाखल होण्याची शक्यता वर्तवली होती. यानंतर ३१ मे पर्यंत मान्सून देशाचे प्रवेशद्वार असलेल्या केरळमध्ये पोहोचेल, अशी माहिती दिली आहे. यामुळे राज्याच्या इतर भागात मान्सूनच्या आगमनाबाबत उत्सुकता असल्याचे आयएमडी अधिकाऱ्यांनी सांगितले.अंदमान आणि केरळ प्रदेशात मान्सूनच्या आगमनाचा अंदाज देत असताना, इतर राज्यांसाठी तारखांचा अंदाज देत नाही. डेटाच्या आधारे, मान्सूनच्या उत्तरेकडील प्रगतीचे मॅप केले जाते. त्यानुसार मान्सून ५ जून रोजी गोव्यात दाखल होऊन ६ जूनपर्यंत कोकणात पोहोचण्याची शक्यता आहे. ७ जूनपर्यंत पुण्यात येण्याचा अंदाज आहे. उल्लेखनीय म्हणजे, या वर्षीच्या मान्सूनच्या प्रारंभादरम्यान बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ तयार झाले नाही. ज्यामुळे मान्सून कोणत्याही व्यत्ययाविना प्रवाश करु शकतो. २००५ पासून, सांख्यिकीय पद्धती वापरून केरळमध्ये मान्सूनच्या आगमन तारखेचा अंदाज वर्तवत आहे.

# उष्माघात होऊ नये यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर दयावा - निवासी उपजिल्हाधिकारी यांचे आवाहन ; उष्मघातापासून वाचण्यासाठी हे उपाय करा

बीड : आगामी दिवसामध्ये उष्णतेची लाट जाणवू शकते. उष्माघात होऊ नये यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर दयावा. उष्माघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने रुग्णाच्या शरीराचे तापमान खाली आणण्यासाठी जवळच्या रुग्णालयात उपचार करून घ्यावेत, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी केले आहे. तसेच उष्माघात उपचारासाठी शासकीय रूग्णालयांत सज्जता ठेवण्याच्या सुचनाही जिल्हा रुग्णालय प्रशासनाला दिल्या आहेत. उष्माघात होण्याची कारणे उन्हामध्ये शारिरीक श्रमाचे, मजूरीचे कामे फार वेळ करणे, कारखान्याचे बॉयलर रूममध्येकामकरणे, काचकारखान्यातीलकामकरणे, जास्त तापमानाच्या खोलीतकामकरणे, घट्ट कपडयांचा वापर करणे, उष्णतशी अथवा तापमानातील वाढत्या परिस्थितीशी सतत संबंध येणे.

उष्माघाताची लक्षणे शरीरास घाम सुटणे, तहान लागणे, शरीर शुष्कहोणे, थकवा येणे, ताप येणे (१०२ पेक्षा जास्त) त्वचा कोरडी पडणे, भुक न लागणे, चक्कर येणे, निरूत्साही होणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बेचैन, अस्वस्थ, बेशुध्द अवस्था उलटी इत्यादी, होणे. जोखीमेचा गट वय -५ वर्षपेक्षा कमी व ६५ वर्षपेक्षा जास्त, कष्टाची सवय नसणारे लोक, धुम्रपान, मदयपान करणारे आणि कॉफी पिणारे व्यक्ती, मुत्रपिंड, हद्रोग, यकृत, त्वचा विकार, लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब इत्यादी रुग्ण, , , , .या औषधींचे सेवन सुरू असलेले रुग्ण, जास्त तापमान, अति आर्द्रता, वातुनूकलनाचा अभाव, तंग कपडे, शेतकाम, कारखान्यातीलकाम ऊन आणि उष्णतेशी संबधीत व्यवसाय करणा-या व्यक्ती. प्रतिबंधात्मक उपाय वाढत्या तापमानाच्या वेळेत कष्टाचीकामे टाळणे, कष्टाची कामे सकाळी लवकर अथवा संध्याकाळी कमी तापमान असताना करावी, उष्णता शोषून घेणारे कपडे उदा. काळया किंवा भडक रंगाचे कपडे वापरु नयेत. सैल व उष्णता परावर्तित करणारे पांढ-या रंगाचे कपडे वापरावेत. जलसंजीवनीचा वापर करावा, पाणी भरपूर प्यावे. सरबत प्यावे. उन्हामध्ये काम टाळावे व सावलीत विश्रांती घ्यावी. शक्यतो उन्हात फिरण्याचे टाळावे. आवश्यक कामे असल्यास उन्हात जाण्यापूर्वी भरपूर पाणी प्यावे. किंवा लिंबू शरबत प्यावे. उन्हात जाण्याअगोदर जेवण करावे, रिकाम्या पोटी उन्हात जावू नये, कान व डोक्याचा उन्हापासून बचाव करणे आवश्यक आहे. डोक्याभोवती पांढरा रुमाल गुंडाळावा. गॉगल्स व हेल्मेट वापरावी. वृध्दांना व बालकांना उन्हात फिरु देऊ नये. उपचार रुग्णास हवेशीर खालीत ठेवणे, खोलीत पंखे, कुलर ठेवावेत. शक्यतो वातानुकुलीत खोलीत ठेवावेत., रुग्णाच्या शरिराचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. रोग्याला बर्फाच्या पाण्याने आंघोळ घालावी, रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्टया ठेवावे. आईसपॅक लावावेत, ओआरएससोल्युशन दयावे.

उन्हाळयामुळे उष्माघाताचे रुग्णावर उपाययोजनाकरणेसाठी व मृत्यू टाळण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांनी, कुटीर रुणालय व ग्रामीण रुग्णालयांनी आवश्यकती सर्व तयारी ठेवणेबाबत कळविण्यात आलेले आहे. (उदा. हवेशीर खोली, पुरेसा औषधी, सलाईनचा साठा, खोलीत पंखे, कुलर इ. सुस्थितीत ठेवावी) यांचीसोय करावी.

बर्फाच्या उपलब्धतेसाठी फ्रिज सुस्थितीत असणे आवश्यक आहे. उष्माघाताची कारणे लक्षणे प्राथमिक उपचार त्याचप्रमाणे उष्माघात होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी याची माहिती आरोग्य शिक्षणाद्वारे प्रचार माध्यमातून दयावी. काय करावे काय टाळावे :- काय करावे -तहान नसलीतरी भरपूर पाणी / सरबत प्यावे, हवा खेळती राहण्याकरीता पंख्याचा वापर करावा. सैल व सौम्य रंगाचे सुती कपडे वापरावे. सावलीत थांबणे, हळुवार चालावे, टोपी, फेटा चष्मा वापरणे, मजुर वर्गास वारंवार विश्रांती घेवु दयावी, उन्हातुन आल्यावर चेह-यावर आलेकापड ठेवावे. काय टाळावे मद्य,सोडा, कॉफी, अतीगार पाणी इ. पिणे, गरज नसतांना उन्हात बाहेर फिरणे, तंग, व गडदकपडे वापरणे, सवय आहे म्हणून उन्हात निघणे, अति व्यायाम करणे, बंद कार मध्ये राहणे, अति शारिरिककष्टाचेकामेकरणे. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये. दुपारी १२.०० ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे. तसेच मोकळया हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावी.असेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

## कौशल्य विकास उद्योजक्ता प्रशिक्षणासाठी अर्ज सादर करावेत

**बीड । प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), जिल्हा कार्यालय बीड मार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील कुटुबाचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नती व्हावी त्यांना रोजगार व स्वयं रोजगाराची साधने उपलब्ध व्हावी म्हणून समाजातील गरजूना आवश्यक त्या व्यवसायाचे प्रशिक्षण देवून त्यांना उपजिविकेचे साधन उपलब्ध होण्याकरिता प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. बीड जिल्हा कार्यालयास सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता एकुण ५०० प्रशिक्षणार्थींचे कौशल्य विकास उद्योजक्ता प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट मुख्यालयाकडून प्राप्त झालेले आहे. बीड जिल्हातील ज्या संस्थेने कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षण पोर्टल वरिल नोंदणी केलेली आहे. अशा प्रशिक्षण संस्थेने ३१ मे २०२४ पर्यत शासनाच्या नियमानूसार सर्व आवश्यक कागदपत्रासह दोन प्रतित प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक यांनी मान्यता दिलेली आहे. अटी, शर्ती निकषा नुसार प्रस्ताव सादर करावेत. तसेच खालील अटी, शर्ती निकष लागु राहतील. प्रशिक्षणार्थीने निवडलेल्या प्रशिक्षणाची फी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे करण्या दिनांक २० ऑगस्ट २०१९ मध्ये नमुद केलेल्या कोर्सेसची निवड प्रशिक्षणार्थीने करणे बंधनकारक राहिल. २)प्रशिक्षण संस्थेने निकर्षाचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यानंतर शासनाच्या नियमानूसार आवश्यक त्या परिक्षेला बसविण्याची जबाबदारी संस्था चालकाची राहिल त्या शिवाय संस्थेची फी अदा केल्या जाणार नाही. प्रशिक्षण संस्थेला प्रशिक्षण कालावधी नुसार २० % ३०% ३०% २०% च्या प्रमाणात प्रशिक्षण फी अदा करण्यात येईल. संस्थेने अंतर्गत प्रशिक्षण पुर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींनां अंतर्गत निवडलेल्या व्यवसायाचा कर्जाचा अर्ज सादर करण्यासाठी सुचित करावे.जिल्हा स्तरावर एका कोर्सेसाठी प्रशिक्षण देण्यासाठी एकाच प्रशिक्षण संस्थेची निवड करण्यात येईल. प्रशिक्षणार्थीची बायोमॅट्रीक पध्दतीने व हजेरी पटावर स्वाक्षरीने हजेरी घेणे बंधनकारक राहिल. संस्थेने विद्यार्थी निहाय प्रमाणित केलेली हजेरी पाठविल्या शिवाय संबधीत प्रशिक्षण संस्थेची प्रशिक्षण फी अदा केली जाणार नाही. प्रशिक्षण घेण्याची ईच्छा असलेल्या अर्जदारासाठी अटी निकष खालील प्रमाणे आहे.

## चालत्या बसमध्ये लागली आग, ८ जणांचा होरपळून मृत्यू

नूंहमध्ये मोठा अपघात घडला आहे. येथे शुक्रवारी रात्री भक्तांनी भरलेल्या बसला अज्ञात कारणामुळे आग लागली. यात बसमधील ८ प्रवाशांचा जळून मृत्यू झाला तर २४ पेक्षा अधिक जखमी झालेत.



या अपघातात बळी पडलेले लोक पंजाब आणि चंदीगड येथे राहाणारे आहेत. हे भक्तगण मथुरा आणि वृदांवन येथून दर्शन करून परतत होते. बसमध्ये प्रवास करत अलेलल्या प्रवाशांनी दिलेल्या माहितीनुसार हे भक्तगण शुक्रवारी वाराणसी आणि मथुरा वृदांवन दर्शनासाठी निघाले होते. बसमध्ये ६० प्रवासी होते. यात महिला आणि मुलांचा समावेश होता. हे सर्व जवळचे नातेवाईक होते. पंजाबच्या लुधियाना होशियारपूर आणि चंदीगड येथे राहणारे होते. शुक्रवार-शनिवारच्या रात्री ते दर्शन करून परतत होते. रात्री उशिरा साधारण दीड वाजण्याच्या सुमारास बसमध्ये आग लागली. दरम्यान, ग्रामस्थांनी चालत्या बसला आग लागल्याचे पाहिले. त्यांनी आवाज देत चालकाला बस रोखण्यास सांगितले मात्र बस थांबली नाही. त्यानंतर एका तरुणाने मोटारसायकलवरून बसचा पाठलाग केला आणि चालकाला आग लागल्याची सूचना दिली. जोपर्यंत बस थांबली होती तोपर्यंत आग बरीच पसरली होती. ग्रामस्थांनी आपल्या प्रयत्नांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार पोलीस आणि फायर ब्रिगेडची गाडी उशिरा तेथे पोहोचली. मात्र तोपर्यंत अनेक लोकांचा जळून मृत्यू झाला होता. यात ८ जणांचा जळून मृत्यू झाला.

## राममंदिर, सावरकरांना विरोध करणाऱ्यांबरोबर नकली शिवसेनेची हातमिळवणी

मुंबई : मुंबई चैत्यभूमीतून प्रेरणा घेते, हे आमचे सरकार आहे. ज्यांनी देश व जगभरात डॉ. बाबासाहेबांचे पंचतिर्थ विकसित केले आहेत. शिवतिर्थच्या या भूमीत कधीकाळी बाळासाहेब ठाकरे व वीर सावरकरांचा आवाज घुमत होता. मात्र, आज विश्वासघाती आघाडीला पाहून त्यांच्या आत्म्याला किती दु:ख झाले असेल. नकली शिवसेनावाल्यांनी शिवसैनिकांच्या बलिदानाला धोका दिला, सत्तेसाठी ते राम मंदिराला विरोध करणाऱ्यांसोबत गेले. सत्तेसाठी हे मुंबई हल्ल्यानंतर पार्टी करणाऱ्या लोकांसोबत गेले, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नाव न घेता उद्धव ठाकरेंनाही आपल्या भाषणातून लक्ष्य केले.

दादर येथील शिवाजी पार्कमधील मैदानावर महायुतीच्या उमेदवारांसाठी आयोजित करण्यात आलेल्या प्रचारसभेत पंतप्रधान मोदी बोलत होते. राज ठाकरेंनंतर पंतप्रधान मोदींनी नेहमीप्रमाणे मराठीतून भाषणाला सुरुवात केली. मोदींनी आपल्या भाषणात विकास कामांचा उल्लेख करत, पुढील २०४७ पर्यंतच्या भारताचे स्वप्न दाखवले. मुंबईतील शिवाजी पार्कवरुन पुन्हा एकदा नकली शिवसेना म्हणत उद्धव ठाकरेंना लक्ष्य केले. कॉंग्रेससह इंडि आघाडी म्हणत इंडिया आघाडीवर हल्लाबोल केला. माझ्याकडे १० वर्षाचे रिपोर्ट कार्ड आहे, आणि पुढच्या २५ वर्षांचा रोडमॅप आहे. पण इंडिया आघाडीकडे काय आहे? जेवढे पक्ष तेवढे पंतप्रधान त्यांच्याकडे आहेत. मुंबईकरांनी बाहेर पडून जास्तीत जास्त मतदान करावे, त्यांचे प्रत्येक मत हे मोदींना जाणार. यावेळी इतिहासातील सर्व रेकॉर्ड मोडणार असून भारत जगातला सर्वात बलशाली देश आणि तिसरी महाशक्ती म्हणून उभारणार आहे, असा विश्वास नरेंद्र मोदींनी व्यक्त केला. नरेंद्र मोदी यांनी, मी तुम्हाला विकसित भारत देऊन जाईन, ही माझी गॅरंटी आहे, असं सूचक विधान करत विकसित भारताचा रोडमॅप मतदारांसमोर मांडला. मंदिरांवर, मंगळसुत्रांवर इंडिया आघाडीची नजर इंडी आघाडीकडे काय आहे, जेवढी माणसे तेवढ्या घोषणा. इंडिया आघाडीची नजर आपल्या मंदिरांवर आहे, महिलांच्या मंगळसुत्रावर आहे. कॉंग्रेसच्या जाहीरनाम्यानुसार तुम्ही तुमच्या मुलांना तुमची संपत्ती देऊ शकणार नाहीत, तुमच्या संपत्तीतील निम्मा हिस्सा त्यांचे सरकार घेणार आहे. व्होट जिहादवाल्यांना ती संपत्ती देण्याचे काम ते करणार आहेत. कॉंग्रेसला अस्तित्व वाचवण्यासाठी ही निवडणूक लढवायची आहे. देशातील लाखो गुंतवणूकदार आज मार्केटसोबत जोडले आहेत. पण, इंडी आघाडीवाले जे कट रचत आहेत, त्यांचा उद्देश देशातील गुंतवणूकदारांचा हा विश्वास तोडण्याचे काम करत आहे, असे म्हणत इंडिया आघाडीच्या धोरणांवर व जाहिरनाम्यावर मोदींनी हल्लाबोल केला.

## भागवत कथेला पहिल्याच दिवशी अभूतपूर्व प्रतिसाद

बीड प्रतिनिधी

संत बंकटस्वामी महाराज यांनी काकडा भजनाची विशेष उपासना पद्धती वारकरी सांप्रदायाला दिली. असे प्रतिपादन राष्ट्रिय भागवत कथा प्रवक्ते गोवत्सल राधाकृष्ण महाराज जोधपूरकर यांनी केली.. श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८० व्यां पुण्यतिथी उत्सवात श्रीमद् भागवत कथेत ते बोलतं होते.. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प किसन महाराज पवार, उध्दव बापू आपेगावकर यांच्या हजारो भावीक भक्तांची उपस्थिती होती.. पहिल्याच दिवशी कथा मंडप भाविकांनी हाऊसफुल्ल झाला. यावेळी विठ्ठला कधी येशील माझ्या घराला.. यां गीतावर कथा मंडपात भाविकांनी मंत्रमुग्ध झाले होते.. श्री क्षेत्र संत बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवात जागतिक खात्याचे भागवत कथाकार गोवत्सल राधाकृष्ण महाराज यांच्या सुमधुरवाणी मधून भागवत कथेला सुरुवात झाली.. पहिल्याच दिवशी भागवत महात्म्य व नाम महात्म्य संगती महिमा, यावरती महाराजांनी सुंदर शब्दात विवेचन केले.. यावेळी बोलताना महाराज म्हणाले की बंकटस्वामी महाराज यांनी वारकरी सांप्रदायात सेवा आणि काकडा हि विषेश उपासना पद्धती मधून देवाशी जोडता येत त्याची सोपी साधना सांगितली..स्वामी च्या दरबारात जेवढी सुंदर कथा होईल तेवढा विठ्ठल प्रसन्न होईल. असा विश्वास व्यक्त केला..संतावर प्रेम करतो तो देवाला मला आवडतो.देवाशी जोडण्याचां उत्तम काळ प्रातकाळ आहे.संत बंकट स्वामीच्या उपासनेची ऊर्जा अजही इथे पाहायला मिळते.. कथा ही ताप हरणारी पाप मुक्त करणारी देवाची प्राप्ती करून देणारी आहे.. कथेच्या सागरात प्रत्येकाने पवित्र स्नान करण्यासाठी यावे. असे महाराजांनी सांगितले. श्री कृष्णाची कथा जीवनाचा उध्दार करणारी आहे..

## मुंबई इंडियन्सच्या नावावर या लाजिरवाण्या रेकॉर्डची नोंद

मुंबई: लखनऊ सुपर जायंट्सने मुंबई इंडियन्सला आयपीएल २०२४मधील( २०२४) ६७व्या सामन्यात हरवले. लखनऊने पहिल्यांदा फलंदाजी करताना २१४ धावा केल्या. याच्या प्रत्युत्तरात मुंबई इंडियन्सला केवळ १९६ धावाच करता आल्या. मुंबईने एका हंगामात सर्वाधिक सामन्यात पराभव मिळवण्याच्या आपल्याच रेकॉर्डशी बरोबरी केली आहे.




मुंबईला आयपीएल २०२४मध्ये १० पराभवाचा सामना करावा लागला आहे. याआधी २०२२मध्येही मुंबईने १० पराभवांचा सामना केला आहे.मुंबई इंडियन्सचा संघ आयपीएल २०२४मध्ये पॉईंट्स टेबलमध्ये सर्वात खालच्या स्थानावर राहिला. ते या हंगामात १४ सामने खेळले या दरम्यान केवळ त्यांना ४ सामन्यात विजय मिळवता आला. तर १० सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. मुंबईने सुरूवातीला तीन सामन्यात सलग पराभव पाहिला. त्यांना गुजरात, हैदराबाद आणि राजस्थानने हरवले. त्यानंतर दिल्ली, लखनऊ आणि कोलकातानेही हरवले. मुंबईला २००९मध्ये ८ सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला होता. यानंतर २०१४ आणि २०१८मध्ये ८-८ सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. त्यानंतर २०२२च्या हंगामात मुंबईने १० सामने गमावले होते आणि आता २०२४मध्ये संघाने १० सामने गमावले आहेत. मुंबईने आपल्या घरच्या मैदानावर खेळलेल्या ७ सामन्यांपैकी ३ सामन्यात विजय मिळवला. तर ४ मध्ये पराभवाचा सामना करावा लागला. तर दुसऱ्या मैदानांवर केवळ १ सामना जिंकला आणि ६मध्ये पराभव स्वीकारला.

## सॅम करनच्या खेळीने पंजाबला तारलं, ५ गडी राखुन राजस्थानला मारलं

मुंबई : राजस्थान आणि पंजाब किंग्सच्या सामन्यात संजु सॅमसनने नाणेफेक जिंकत फलंदाजीचा निर्णय घेतला. सलामीवीर जॉस बटलरच्या जागी संधी मिळालेल्या टॉम कोहलर-कॅडमोर याने १८ धावा केल्या. तर यशस्वी जयस्वाल ४ धावा बनवुन बाद झाला. कर्णधार संजू सॅमसन देखील काही खास करु शकला नाही. त्याने १५ बॉलमध्ये ३ चौकारांसह १८ धावा जोडल्या.



त्यानंतर आलेल्या रियान परागचं अर्धशतक अवघ्या २ धावांनी हुकलं. रियान पराग याने ३३ बॉलमध्ये ६ चौकारांच्या मदतीने ४८ धावा केल्या. रियानच्या धावांमुळे राजस्थान सन्मानजनक आव्हान देऊ शकला. आर अश्विनने १ सिक्स आणि ३ चौकारांच्या मदतीने २८ धावांचं योगदान दिलं. पंजाबकडून राहुल चहर, हर्षल पटेल आणि कॅप्टन सॅम करन या तिघांनी सर्वाधिक १-१ गडी बाद केले. तर अर्शदीप सिंह आणि नॅथन एलिस यांच्या खात्यात १-१ गडी बाद केले. राजस्थानन २० षटकांमध्ये ९ गडी गमावून १४४ धावा करु शकले. राजस्थानने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना पंजाबचे सलामीवीर विशेष खेळी करु शकले नाहीत. प्रभसिमरन ६ धावा तर जॉनी बेअरस्टो १४ धावांवर बाद झाला. त्यानंतर आलेला रोसोदेखील २२ धावांवर परतला. पण अडचणीच्या वेळी सॅम करनने कर्णधार पदाला साजेशी खेळी करत संघाला सावरलं. जितेश शर्माने २२ धावांच योगदान दिले.राजस्थानकडुन युजवेंद्र चहल आणि आवेश खानने २-२ गडी बाद केले. तर ट्रेन्ड बोल्टने १ गडी बाद केला. पण करनने ४१ चेंडुत ६३ धावा बनवुन विजश्री खेचुन आणला. पंजाबने ५ गडी राखुन राजस्थानचा पराभव केला.

## मुलाला वाचवताना तिघांचा नदीत बुडून मृत्यू! कोल्हापुरात घडली भीषण दुर्घटना

कोल्हापूर : कोल्हापुरातून एक भीषण दुर्घटना समोर आली आहे. बुडत असलेल्या भाच्याला वाचवण्याच्या नादात मामा, मामाची मुलगी आणि मामाची बहिण असे तिघेजण नदीत उतरले. परंतु नदीचा प्रवाह प्रचंड असल्याने बुडणार्या मुलासकट तिघांचाही नदीत बुडून मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी तिघांचे मृतदेह सापडले असून भाच्याचा अजूनही शोध घेतला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कोल्हापूर जिल्ह्यातील कागल () तालुक्यातील बस्तवडेमध्ये वेदगंगा नदीवर ( ) असणाऱ्या बंधाऱ्यात बुडून चौघांचा मृत्यू झाला. शाळकरी मुलाला वाचवण्याच्या नादात एकमेकांना मिठी मारल्याने हा भयंकर प्रकार घडला. जितेंद्र विलास लोकरे (वय ३६, रा. मुरगूड ता. कागल), त्याची बहीण रेश्मा दिलीप येळमल्ले (वय ३४), भाचा हर्ष दिलीप येळमल्ले (वय १७, दोघे रा. अथणी, कर्नाटक) आणि मामाची मुलगी सविता अमर कांबळे (वय २७ रा. रुकडी, ता. हातकलंगले) अशी त्यांची नावे आहेत. तिघांचे मृतदेह गावकऱ्यांनी शोधून काढले आहेत.



हर्षचा शोध काल रात्री नऊ वाजेपर्यंत सुरुच होता. आज पुन्हा रेस्क्यू पथकाकडून शोध घेतला जाणार आहे.

नेमकं काय घडलं? आणूर गावच्या जत्रेसाठी हे सर्वजण जमले होते. काल दुपारच्या सुमारास ते वेदगंगा नदीकडे गेले होते. काळम्मावाडी धरणाचे पाणी वेदगंगा नदीत सोडल्याने नदीतील पाण्याचा प्रवाह मोठा होता. कपडे धुण्यासाठी आणि आंघोळीसाठी नदीत उतरले असतानाच हर्ष खोल पाण्यामध्ये बुडाला. आरडाओरडा करण्यात आल्यानंतर शेजारी असणारा मामा जितेंद्र पाण्यात उतरला. पाठोपाठ रेश्मा, साधना व सविता सुद्धा उतरल्या. मात्र, पाण्याचा प्रवाह मोठा असल्याने भीतीपोटी मिठी मारल्याने ते नदीत बुडाले.

चौघे बुडताना काठावर असलेल्या जितेंद्र लोकरे यांच्या मुलीने पाहिल्याने आरडाओरडा करण्यास सुरुवात केली. यावेळी मासे पकडण्यास आलेल्या अवधूत यांनी गावातील प्रमोद पाटील यांना बोलावून नदीत उडी मारली. साधना लोकरे यांना वाचवण्यात त्यांना यश आलं. मात्र, इतर तिघांचा मृत्यू झाला. तिघांचे मृतदेह त्यांनी काठावर आणले. हर्षला शोधण्याचे काम सुरू होते. मात्र रात्रीपर्यंत त्याचा मृतदेह न सापडल्याने आज पुन्हा एकदा शोधमोहीम हाती घेतली जाणार आहे.

हसन मुश्रीफांनी घेतली घटनेची दखल

दरम्यान, परदेशवारीवर असलेल्या वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी या घटनेची तातडीने दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी संपर्क साधला. तसेच कागलच्या तहसीलदारांशी सुद्धा संपर्क साधला. मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून या सर्व मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळण्यासाठी तातडीने प्रस्ताव करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अमोल येडगे व तहसीलदार अमरदीप वाकडे यांना दिल्या आहेत.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे




सायं.दैनिक
अ बीड
# प्रारंभ
शनिवार दि. १८ मे २०२४ (पान ४)




# भगवंताने माणसाला चांगले जीवन व देह दिला आहे त्याचा समाजसेवेसाठी उपयोग करावा -महादेवानंद भारती महाराज

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

भगवंताने माणसाला चांगले जीवन व शरीर देह दिलेला आहे त्याचा समाजसेवेसाठी उपयोग करावा तसेच माणसाने आपल्या जीवनामध्ये आपण दुसऱ्यासाठी काही करत इतरांसाठी,स्वतःसाठी,कुटुंबासाठी जीवन जगले पाहिजे असा संदेश गुरुवर्य महंत स्वामी महादेवानंद भारती महाराज (मठाधिपती श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान पिंपळवंडी) यांनी अभिष्टचिंतन सोहळ्याप्रसंगी जमलेल्या जनसमुदायाला दिला.

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनचे मठाधिपती गुरुवर्य स्वामी महादेवानंद भारती महाराज यांचा दि.१५ मे २०२४ बुधवार रोजी पिंपळवंडी पंचक्रोशी मंडळ व तरुण मंडळाचे वतीने ७४ वा (वर्ष-३ रे) अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या जल्लोषात व भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.या निमित्त महादेवानंद भारती महाराज यांचे आकर्षक रथातून येथील पाटील वस्ती पासून श्री.स्वामी अमृत भारती विद्यालय कार्यक्रम स्थळापर्यंत डीजेच्या ताफ्यासह तोफा-फटाकेच्या आतषबाजीत व कलश धारि महिलांसह भव्य-दिव्य मिरवणूक संपन्न झाली.

यावेळी व्यासपीठावर महंत स्वामी महादेवानंद भारती महाराज,ह.भ.प.अमृत महाराज जोशी,विष्णू देवानंद महाराज, संतोष भारती महाराज,शिवानंद भारती महाराज,भागवत पुरी महाराज,रामानंद



महाराज,शिवाजी महाराज हनुमान टेकडी, दत्ता महाराज,पांडुरंग महाराज कुंभार, मिनाताई मडके महाराज,परमानंद भारती महाराज,प्रेमानंद महाराज,बजगुडे महाराज आदीसह युवराज काशीद अजय काशीद (वस्ताद),बाबासाहेब चव्हाण (सेवानिवृत्त पीएसआय),राजू भैया जाधव,भाऊसाहेब भवर,निलेश मोरे,उद्धव शेठ पवार,श्रीपती गाडे, ॲड.एन.एन.साबळे,ॲड.मंगेश पोकळे,प्रा.जोगदंड सर,विश्वजीत जायभाये आदींची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी छत्रपती संभाजी राजे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर महंत गुरुवर्य महादेवानंद भारती महाराजांचे अभिष्टचिंतन करण्यात येऊन त्यांचा वैयक्तिक व ग्रामस्थांच्या वतीने पुष्पहार घालून व फेटा बांधून भव्य सत्कार करण्यात आला.तसेच महादेवानंद भारती महाराज यांच्या हस्ते पिंपळवंडी परिसरातील अनेक ज्येष्ठ व्यक्तींचा पुष्पहार,श्रीफळ,फेटा बांधून व फोटो फ्रेम तसेच महिलांचा साडी व फोटो फ्रेम देऊन सन्मान करण्यात आला. तसेच महादेवानंद भारती महाराज आपल्या सत्कार भाषणातून म्हणाले की,संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम महाराजांनी मराठी भाषा शिकविली आहे.पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मला जे प्रेम आजपर्यंत दिले येथून पुढेही देतील यात शंकाच नाही.येथील तरुण मंडळीचे कौतुक करावे ते थोडेच आहे. तुमचे सर्वांचे कल्याण व्हावे ही देवाला प्रार्थना करतो.श्री क्षेत्र अश्वत्थलिंग देवस्थान हे पूर्वी शासकीय ट्रस्ट होते. परंतु,मी स्वतः घटना तयार करून हे संस्थान पब्लिक ट्रस्ट करून घेतले. याचा यावेळी आवर्जून उल्लेख केला. तसेच या परिसरातील शेत जमीन ओलिताखाली यावी यासाठी मा.मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या ▶▶ पान २ वर...

## युवा मल्हार सेना महाराष्ट्र च्या सरसेनापतीपदी गणेश कोळेकर



**बीड । प्रतिनिधी**


युवा मल्हार सेना महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष इंजीनियर विष्णू देवकते यांच्या आदेशाने युवा मल्हार सेना महाराष्ट्र राज्य सरसेनापती पदी गणेश कोळेकर पाटील यांची निवड करण्यात आली युवा मल्हार सेनेचे संस्थापक अध्यक्ष दादा देवकते व संस्थापक सचिव एडवोकेट राजू शिंदे यांच्या हस्ते यांना स्वाक्षरीत नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली श्री कोळेकर पाटील यांच्या निवडीचे महाराष्ट्र राज्यातून युवा मल्हार सेनेच्या पदाधिकारी यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले, यावेळी गणेश कोळेकर पाटील म्हणाले आहेत की युवा मल्हार सेनेचे कार्य राज्यभर ग्रामीण भागामध्ये पोहचवनार.

## हिंदू-मुस्लिमांचं श्रध्दास्थान हजरत मौलाली बाबांचा यात्रोत्सव

**कडा । प्रतिनिधी**

ग्रामदैवत तथा सर्वधर्मियांचं श्रध्दास्थान म्हणून नावलौकिक असलेल्या हजरत मौलाली बाबांचा यात्रोत्सव-उरूस गुरूवारी दि.२३ मे पासून मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे.

आष्टी तालुक्यातील कडा हिंदू -मुस्लिम एकोपा जोपासणारं गाव म्हणून मराठवाड्यात नावलौकिक आहे.याठिकाणचा यात्रोत्सव सामाजिक एकतेचे प्रतीक मानला जातो.कडीनदीच्या किनारी ग्रामदैवत तथा सर्वधर्मियांचं श्रद्धास्थान हजरत मौलाली बाबांची दर्गाह आहे.दरवर्षी सर्वधर्मिय ग्रामस्थ एकत्रितपणे खेळीमेळीच्या वातावरणात हा उत्सव साजरा करतात. व्यावसाय,नोकरीनिमित्त बाहेरगावी गेलेले नागरिक बाबांच्या यात्रेच्या निमित्ताने आवर्जून हजेरी लावतात.बुध्द पौर्णिमेपासून यात्रेला सुरूवात होते. पौर्णिमेच्या अगोदर येणा-या बुधवारी हजरत मौलाली



बाबांना संदल लावतात.यावर्षी गुरूवार दि.२३ मे पासून यात्रोत्सवास सूरूवात होत आहे.सर्व ग्रामस्थ एकत्रित येऊन बाबांची सवाद्य छबीना मिरवणूक काढतात.बाबांच्या समाधीला फुलांची चादर अर्पण करून श्रीफळ, मलिदा ,गुळ-खोब-याच्या शेरणीचा प्रसाद दाखवून भाविक-भक्त आपली इच्छापुर्ती करतात.त्याच दिवशी पहाटेच्या दरम्यान शोभेच्या रंगीत फटाक्यांची आतिषबाजी लक्षवेधी असते.हा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासाठी महिला,पूरूष, बालगोपाळ देखील सहभागी होतात.तर दुस-या दिवशी नामवंत मल्लांच्या कुस्तीची दंगल आयोजित करण्यात येते.नदीकाठी थाटलेल्या विविध दुकानांना विधुत रोषणाईने सजविण्यात येते.यात्रेत आलेली मनोरंजनाची साधने यात्रेकरूंची लक्षवेधुन घेतात.कडयाची यात्रा म्हणजे हिंदू -मुस्लिम बांधवांच्या एकतेचं प्रतीक मानली जाते, यातूनच सामाजिक एकोप्याचे दर्शन अनुभवायला मिळते.हा यात्रोत्सव-उरूस शांततेत साजरा करण्यासाठी ग्रामस्थ,सरपंच,उपसरपंच, ग्रा.प.सदस्य, यात्रा कमिटी, पोलिस प्रशासन एकत्रितपणे परिश्रम घेताना पहायला मिळतात.हेच हजरत मौलाली बाबांच्या यात्रेचं वैशिष्ट्य मानलं जातं.

## बस व मोटारसायकलची धडक; युवक जागीच ठार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

माहेरी गेलेल्या बायकोला परत घरी आणावयास गेलेल्या अजीम शेख या युवकाचा बस व मोटार सायकलच्या समोरासमोर धडकेत जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे. अंबाजोगाई येथील सदर बाजार परिसरात सध्या चनई येथे वास्तव्यास असलेला तसेच शहरातील मिलिया शाळेतील स्कुल बसचा चालक अजीम हजू शेख हा युवक पाटोदा येथे माहेरी गेलेल्या पत्नीस आणावयास जात होता. मात्र पाटोदा येथे पोचण्यापूर्वीच गावच्या पंधरा किलोमीटर अलीकडेच भिवंडी अहमदपूर (-१३ ७८९६) गाडीची समोरासमोर धडक होऊन त्या युवकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेने पाटोदा तसेच अंबाजोगाई शहर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्याच्या पश्चात आई, वडील ,पत्नी व मुलगा असा परिवार आहे. सदरील घटना समजताच आमचे मित्र तथा आमदार सुरेश धस यांचे निकटवर्तीय शेख आसेफ व त्यांच्या सहकाऱ्यांनी तात्काळ धाव घेऊन सदरील युवकाचे आधारकार्ड पाठवून मयत युवकाची माहिती मिळवली. मयताचे नातेवाईक तिथे पोचेपर्यंत त्याच्या नातेवाईकांच्या सांगण्यावरून शवविच्छेदन करून शव आलेल्या त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देईपर्यंत संपूर्ण सहकार्य केले.

## प्रसार माध्यमांच्या दणक्याने जाग येताच महावितरणने रोहित्र बसविले

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील ताकडगाव रोड येथे रोहित्र बसविण्यासाठी गेल्या एक महिन्यापूर्वी पोल उभे करूनही रोहित्र बसवली नाही. यामुळे महावितरणने नागरिकांना वेड्यात काढलं. अशा संदर्भातील वृत्त प्रकाशित होताच याची दखल महावितरणने घेतली आणि लगोलग रोहित्र बसवण्यात आला. याबद्दल महावितरणला धन्यवाद देण्यात येत आहेत. माहिती अशी की सदरील भागातल्या लोकांना कमी दाबाने विज पुरवठा होत



होता असल्यामुळे लोकांनी आ. लक्ष्मण अण्णा पवार यांना विनंती केली तसे त्यांनी सदरील रोहित्र बसविण्याचे काम करण्याबाबत महावितरणला सुचित केले होते. त्यानुसार महिना भरापूर्वी रोहित्र टाकण्यासाठी खांब देखील उभे केले परंतु रोहित्र टाकलीस नाही महावितरण विभागाचे अधिकारी आणि गुत्तेदार यांनी लोकांना वेड्यात काढून जाणीवपूर्वक त्रास देतात की काय? अधिकाऱ्याच्या दुर्लक्ष मुळे जनतेचे हाल होत आहेत

## संत बंकटस्वामी महाराज यांच्या भव्य पालखी मिरवणुकीने पुण्यतिथी उत्सवाची थाटात सुरुवात

**शोभा यात्रा आणि भव्य पालखी मिरवणुक डोळ्याचे पारणे फेडणारा सोहळा**

**स्वानंदसुखनिवासी जोग महाराज वारकरी किर्तनभवनाचे उद्घाटन संपन्न**

**भव्य कीर्तनभवनाने बंकटस्वामींच्या आध्यात्मिक वैभवात भर - महादेव महाराज चाकरवाडीकर.**

**नेकनूर । प्रतिनिधी**

भव्य पालखी शोभायात्रा हजारो कलशधारी महिला, शेकडो बाल वारकरी टाळ मृदंगाच्या जयघोषात श्रीक्षेत्र नेकनूर येथे बंकटस्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी उत्सवाची मोठ्या थाटात सुरुवात झाली.संत महंतांच्या हस्ते टाळ,विना,मृदंग,पालखी आणि ग्रंथ पुजन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत महादेव महाराज चाकरवाडीकर,श्री ह भ प महंत हरिहर भारती



महाराज,श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे , श्री ह भ प महादेव आनंद भारती. श्री ह भ प तुकाराम महाराज भारती, सत्यवान महाराज लाटे, नाना महाराज कदम सुरेश म जाधव, श्रीकृष्ण महाराज यादव, वसंत महाराज शिंदे यांच्या सह हजारो भावीक भक्त मंडळी उपस्थीत होतें..

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र नेकनुर येथे वै.श्रीगुरू बंकटस्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी उत्सवाची सुरुवात शुक्रवारी सकाळी मोठ्या थाटात सुरुवात झाली.. यावर्षी नव्याने अभिनव उपक्रम घेत शोभा यात्राव भव्य पालखी मिरवणूक सकाळी ८ वाजता विठ्ठल रुक्मिणी मंदिर शिक्षक कॉलनी ते कीर्तन मंडप या ठिकाणी करण्यात आले यावेळी पिवळ्या रंगाच्या आणि भगव्या रंगाच्या साड्या परिधान करून कलशधारी १००० सुवासिनी महिला , कुमारीका मुली सहभागी झाल्या होत्या..

बंकटस्वामी वारकरी शिक्षण संस्थेतील बालवारकरी याच्या पाऊलीच्या ▶▶ पान २ वर...

## घराची वाटणी मागितलीस तर तुला जीवे मारू

**अंबाजोगाईतील महिलेची सवतीसह त्यांच्या मुलांवर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पतीच्या निधनानंतर मी अंबाजोगाई शहर सोडून आळंदी येथील धोंडोपंत दादासाहेब आतरे यांच्या मंदिरात राहुन उपजिविका भागवत आहे. परंतु माझ्या पतीच्या नावावर असलेली जागेची वाटणी मागीतली असता सवतीसह तिच्या मुलांनी जिवे मारण्याची धमकी दिल्यामुळे त्यांच्या विरोधात अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात चौंघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

अंबाजोगाई शहरातील जनाबाई मुरलीधर जाधव (वय ४२) व्यवसाय मजूरी रा.विद्याकुंज कॉलनी प्रशांत अंबाजोगाई येथील रहिवासी असून पती मुरलीधर जाधव यांचे निधन झाल्यानंतर मी व माझी आई, भाऊ असे आम्ही एकत्र आळंदी येथील धोंडोपंत दादासाहेब आतरे यांच्या मंदिरात राहत आहोत. तेथील मंदिरातील झाड-झोड करून आम्ही आमची उपजिविका भागवतो. माझे पती मुरलीधर जाधव हे पंधरा वर्षापुर्वी मयत झाले असून १६ मे रोजी सकाळी १० वाजता मी माझ्यावडीलांसह बंधुप्रेम कॉलनी प्रशांत नगर भागातील आलो असता माझी सवत कमलबाई मुरलीधर जाधव, शिवाजी मुरलीधर जाधव, बालाजी मुरलीधर जाधव या तिघांकडे माझ्या नावाची वाटणी मागीतली असता त्यांनी मला शिविगाळ करून शिवाजी शेप, रा.शेपवाडी याने पण मला शिविगाळ करून सर्वांनी मिळून मला म्हणाले की, तु जर वाटणी मागीतलीस तर तुझा काटा काढून टाकू अशी जिवे मारण्याची ▶▶ पान २ वर...

## शेतीच्या वादातून महिलेस मारहाण

**शिरूर । प्रतिनिधी**

आमची शेती वाटून का देत नाही म्हणत घरात स्वयंपाक करत असलेल्या महिलेला चौघा जणांनी संगणमताने शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना तालुक्यातील आनंदगाव या गावी बुधवार दि. १५ मे रोजी रात्री घडली असून शिरूर पोलीस स्टेशनमध्ये यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरूर कासार तालुक्यातील आनंदगाव येथील रूपाली गणेश विघ्ने (२८) या महिलेने शिरूर पोलीस स्टेशनला दिलेले फिर्यादी नुसार रूपाली विघ्ने ही महिला बुधवार दि.१५ मे रोजी सायंकाळी आपल्या घरात स्वयंपाक करत होती आरोपी अंबादास किसन विघ्ने, अशोक अंबादास विघ्ने,चंद्रकला दिलीप विघ्ने हे चौघेजण घरात आले आणि आम्हाला आमची शेती वाटून का देत नाहीस असे म्हणत अंबादास विघ्ने व अशोक विघ्ने यांनी शिवीगाळ केली तर कविता विघ्ने हिने हातात असलेला विळा रुपालीच्या हातावर मारल्याने हाताला इजा होऊन मोठा रक्तश्राव झाला. त्याच बरोबर लोखंडी गजाने हे मारहाण झाली आहे. रुपाली गणेश विघ्ने यांच्या फिर्यादी वरून शिरूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भिमजन्मभूमीच्या विकासासाठी डॉ.राहुल धाकडे यांनी पुढाकार घ्यावा - अमर हबीब

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

भिमजन्मभूमीच्या विकासासाठी मिळालेल्या संदीचा सदुपयोग करून डॉ.राहुल धाकडे यांनी आपल्या कल्पकतेतून नविन संकल्पना तिथे राबवावी. व भिमजन्मभूमीच्या विकासासाठी आपले योगदान द्यावे. अशी अपेक्षा ज्येष्ठ साहित्यीक तथा किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांनी व्यक्त केली.

येथील सामाजिक कार्यकर्ते तथा प्रसिद्ध श्वसन व छातीविकार



तज्ञ डॉ.राहुल धाकडे यांची भिमजन्मभूमी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेमोरीयल सोसायटी, महु जिल्हा इंदोर (मध्यप्रदेश) च्या राष्ट्रीय कार्यकारीणीवर निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचा अंबाजोगाईकरांच्या वतीने नागरी सत्कार ▶▶ पान २ वर...

## बुद्ध पौर्णिमेच्या दिनी दक्षिण कोरियात साकारला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पहिला पुतळा

**सांस्कृतिक व लोकशाही समन्वयाचा उत्सव केला उत्साहात साजरी; डॉ.उपगुप्तो महाथेरो यांनी पुतळा उभारणीसाठी केले विशेष प्रयत्न**

**बीड । प्रतिनिधी**

कोरियन परंपरेप्रमाणे बुद्ध जन्मदिन १५ मे रोजी साजरी करण्यात येतो (कोरियन लुनार कॅलेंडर नुसार) या दिनाचे औचित्य साधून एका ऐतिहासिक घटनेत दक्षिण कोरिया येथील बुद्ध विहारामध्ये डॉ.बी.आर.आंबेडकर यांचा पहिला पुतळा अनावरण केला आहे. डॉ.बी.आर.आंबेडकर हे एक प्रसिद्ध भारतीय न्यायविद, अर्थशास्त्रज्ञ आणि समाज सुधारक होते. त्यांनी भारतात बौद्ध धर्माच्या पुनरुज्जीवनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून येओंगप्योंग, सेऊल येथील नवनिर्मित आणि प्रसिद्ध जेड बुद्ध विहारात हा पुतळा अनावरण सोहळा उत्साहात पार पडला. या पुतळा



अनावरण सोहळ्यास भारतीय प्रतिनिधीमंडळात लंडन बिझनेस स्कूलचे आयु.नितीन साळवे, नालंदा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे, एमएसईबी माजी अधीक्षक अभियंता रवींद्र कोलप, आयु.लक्ष्मण कांबळे (लातूर), माजी नगरसेवक जयकुमार पवार (लातूर), प्रशिक इन्फ्रास्ट्रक्चरचे डायरेक्टर वैभव आदमाने(छत्रपती संभाजीनगर), सेजोंग विद्यापीठातील प्रोफेसर डॉ.पलाश इंगळे,आयु.मनीष वासनिक, कोरिया प्रमुख (एअर इंडिया) मधु वासनिक, दिपाताई रोडे , डॉ.प्रियंका रोडे (बीड) यांचा समावेश होता. अनावरण समारंभाचे नेतृत्व कोरियातील चोंग धाम भंतेजी यांनी केले. दोन्ही कोरियन भंतेनी महा प्रज्ञापारमिता सूत्र आणि बुद्धाच्या आशीर्वादाच्या सूत्रांचे कोरियनमध्ये पठण केले तर डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मुख्य भाषणाचे वाचन नितीन साळवे केले आणि डॉ. जय सुंग सीईओ यांनी अनुवाद केला.

दक्षिण कोरियातील सेऊल पासून ३० कि.मी. अंतरावर आहे.

के-पॉप आणि के-ड्रामासारख्या जागतिक सांस्कृतिक निर्यातीसाठी प्रसिद्ध असलेल्या दक्षिण कोरियाने त्यांच्या १७०० वर्षांपूर्वीच्या बौद्ध परंपरांचा आदर केला आहे. ज्याने देशाच्या चारित्र्याला मोठ्या प्रमाणात आकार दिला आहे. डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याचे अनावरण हे भारत आणि कोरिया यांच्यातील कायमस्वरूपी सांस्कृतिक आदान-प्रदानाचे प्रतीक आहे. जे बोधिधर्म होएचो आणि महानंद यांच्यासारख्या प्राचीन विद्वानांपासून सुरू झाले आहे.

पुतळा उभारणीसाठी स्थानिक भारतीय आणि कोरियन समुदायांच्या एकत्रित प्रयत्नांनी आणि दोन्ही बाजूंच्या बौद्ध भिक्षूंनी नेतृत्व केले आहे. जेड बुद्ध विहाराने न केवळ ▶▶ पान २ वर...